THE JALGAON DISTRICT CENTRAL CO.OP. BANK LTD., JALGAON

Head Office, 27, Ring Road, Jalgaon-425002.
Tel No : 2241671,72,73,76,78,79 Fax: (0257) 2221712
Reg No.: 1129 of 27.05.1926, License No.: RPCD (MRO) 2270/16.01.038/2011.12 Dt.28.03.2012
www.jdccbank.com Email-id : jdccbankjal@rediffmail.com, jdccbankjal@gmail.com,

# कारकुन (सपोर्ट स्टाफ) पदांच्या भरती साठी ऑन-लाईन परीक्षा

## परीचय पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑन-लाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवारास या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या बहुपर्यायी प्रश्नावल्या असतील.

| अनु. क्र. | चाचणी | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तर्कशक्ति | 25 | 25 | इंग्रजी व मराठी | 90 मिनट |
| 2 | इंग्रजी भाषा | 10 | 10 | | |
| 3 | सामान्य सचेतता (बैंकिंग संदर्भ सहित) | 20 | 20 | | |
| 4 | संगणक ज्ञान | 25 | 25 | | |
| 5 | अंकगणितीय योग्यता | 20 | 20 | | |
| | **एकूण** | **100** | **100** | | |

परीक्षेसाठी 90 मिनटांचा अवधी आहे, तरीसुद्धा उमेदवारास परीक्षास्थानी साधारणतः 120 मिनिटे असावे लागेल ज्यामध्ये नोंद होणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ.साठी लागणार्या कालावधीचासुद्धा समावेश आहे. इंग्रजी भाषेव्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या इंग्रजी आणि मराठीत असतील. दिलेल्या 90 मिनिटात कोणत्याही वेळी 1 ते 100 मधील कोणताही प्रश्न उमेदवार सोडवू शकतात. सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास सर्वाधिक अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक$' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. उमेदवाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी दंड नसेल.**

उमेदवाराने प्रत्येक वस्तुनिष्ठ चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ऑनलाईन परिक्षेचे गुण पुढील प्रक्रियेचा स्विकार करुन प्राप्त करण्यात येतील.

(i) प्रत्येक वस्तूनिष्ठ चाचणीमध्ये उमेदवाराने बरोबर उत्तर दिलेल्या प्रश्नांची संख्या, बरोबर गुण देण्याचा निर्णय घेताना विचारात घेतली जाईल.

(ii) उमेदवाराने अशा प्रकारे प्राप्त केलेले बरोबर गुण, समीकृत गुणांबाबत निर्णय घेण्याकरीता विविध सत्रांमध्ये घेण्यात आलेल्या प्रत्येक वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये आवश्यकता भासल्यास, शंका असल्यास किरकोळ बदलाची दखल घेण्याकरीता सममूल्य करण्यात येतील.*

* कोणत्याही चाचणीमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेले गुण, सर्व नमुन्याच्या (form) गुणांच्या वितरणाचा विचार करुन मुळ प्रकाराशी समीकृत आहेत.

(iii) चाचणीनिहाय गुण आणि एकूण गुण, दोन अंकांपर्यंत दशांश बिंदुसह कळविण्यात येतील.

टिप : Cutoff दोन टप्प्यांमध्ये देण्यात येतील :

(i) व्यक्तिगत चाचणी मधील गुण.

(ii) एकूण गुणांवरील गुण.

**कृपया ध्यानात घ्या की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद न केलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

काही नमुना प्रश्न खाली दिले आहेत.

## तर्कशक्ति

**प्र.1.** मुलांच्या एका रांगेत महेश रांगेच्या डावीकडून सातवा आणि उजवीकडून अठरावा आहे. त्या रांगेत एकूण किती मुले आहेत?

(1) 26 (2) 25 (3) 27 (4) निश्चित सांगता येत नाही (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.2.** खालील इंग्रजी वर्णाक्षरगटाच्या श्रृंखले मध्ये प्रश्नचिह्नाच्या (?) जागी दिलेल्या इंग्रजी वर्णाक्षरगटांपैकी कोणता गट येईल ?

AB BC CD DE ? FG

(1) DF (2) DG (3) FE> (4) EF (5) GF

**प्र.3.** एका सांकेतिक परिभाषेत 'A + B' चा अर्थ 'B ची आई A आहे ' असा आहे आणि 'A – B' चा अर्थ 'B चे वडील A आहेत' असा आहे. खालीलपैकी कशाचा अर्थ 'R ची आजी P आहे ' असा होईल ?

(1) P – Q + R (2) Q – R + P (3) P + Q – R (4) Q + R – P (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.4.** काही नेते अप्रामाणिक असतात. सत्यप्रीय हा नेता आहे. या दोन विधानांवरुन खालीलपैकी कोणता निष्कर्ष निश्चितपणे निघतो?

(1) सत्यप्रीय प्रामाणिक आहे. (2) सत्यप्रीय अप्रामाणिक आहे.
(3) काही नेते प्रामाणिक असतात. (4) नेते हे सामान्यतः अप्रामाणिक असतात.
(5) सत्यप्रीय हा काही वेळ अप्रामाणिक असतो

## इंग्रजी भाषा

या परिक्षेचे प्रयोजन तुमचे इंग्रजी भाषेचे ज्ञान जाणणे हे आहे. समानार्थी व विरूद्धार्थी शब्द, वाक्य पूर्ण करणे, उतारावरील आकलन संबंधित प्रश्नांनी तुमची इंग्रजी भाषे संबंधी परीक्षा घेतली जाईल.

**Q.1-2.** Read each sentence to find out whether there is any grammatical or idiomatic error in it. The error, if any, will be in one part of the sentence. The number of that part is the answer. If there is no error, the answer is 'No error'. (Ignore the errors of punctuation, if any).

**Q.1.** Most of the third world (1) / country are experiencing (2) / the ethnic or communal problem/ (3) in varying degrees. (4) No error (5)

**Q.2.** The regaining of freedom (1) / as we well know has given rise for (2) / many dormant issues / (3) and conflicts in our society. (4) No error (5)

**Q.3-4.** Pick out from the words given below each sentence the word which would complete the sentence correctly and meaningfully.

**Q.3.** Continuous unemployment has induced in the people a kind of _____ which is most depressing.
(1) laziness (2) encouragement (3) satisfaction (4) anger (5) awakening

**Q.4.** He wants me to look ____ his garden during his absence.
(1) at (2) over (3) after (4) into (5) from

**Q.5-10.** In the following passage there are blanks, each of which has been numbered. These numbers are printed below the passage and against each, five words are suggested, one of which fits the blank appropriately. Find out the appropriate word in each case.

The true (5) of rights is duty. If we all (6) our duties, rights will not be (7) to seek. If leaving duties unperformed we run (8) rights, they will (9) us like an elusive person. The more we pursue them, the farther (10) they fly.

**Q.5.** (1) end (2) source (3) joy (4) purpose (5) power

**Q.6.** (1) deny (2) devote (3) discharge (4) imagine (5) fulfill

**Q.7.** (1) far (2) close (3) easy (4) against (5) common

**Q.8.** (1) as (2) after (3) at (4) from (5) for

**Q.9.** (1) hold (2) grab (3) fight (4) escape (5) chase

**Q.10.** (1) off (2) can (3) did (4) could (5) towards

## सामान्य सचेतता (बँकिंग संदर्भ सहित)

**प्र.1.** "कुंभ मेळा" _____ वर्षांनी आपल्या देशात आयोजित केला.
(1) 6 वर्ष (2) 10 वर्ष (3) 12 वर्ष (4) 14 वर्ष (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.2.** खालीलपैकी कोणत्या क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ सादरीकरणासाठी "ऑस्कर" पारितोषिके दिली जातात?
(1) चलचित्रपट (2) साहित्य (3) क्रिडा (4) विज्ञान (5) समाजसेवा

## संगणक ज्ञान

**प्र.1.** _____ हा संगणकाचा आउटपुट डिवाइस आहे.
(1) प्रिन्टर (2) CPU (3) माउस (4) की बोर्ड (5) CD

**प्र.2.** खालीलपैकी कोणती एक संगणकाची भाषा आहे ?
(1) A + (2) BA + (3) C ++ (4) CA + (5) यापैकी एकही नाही

## अंकगणितीय योग्यता

**प्र.1.** दहा पैश्याला एक, तर 6 लिंबाची किंमत किती ?
(1) 6 (2) 10 (3) 60 (4) 61 (5) 610

**प्र.2.** खालीलपैकी कोणती संख्या चार पटीत तंतोतंत असू शकते ?
(1) 27114 (2) 58204 (3) 48402 (4) 32286 (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.3-4.** खालीलपैकी प्रत्येक प्रश्नात एक नंबर गहाळ आहे. प्रश्न चिन्हांने दाखविलेल्या जागी जेथे संख्या गहाळ आहे आपल्याला शोधून काढायचे आहे की क्रमांक (1), (2), (3) आणि (4) जागी दिलेल्या पैकी कोणती संख्या प्रश्न चिन्हाच्या जागी घेईल. जर चार ही पैकी एक ही प्रश्न चिन्हांच्या जागा घेत नसेल तर (5) हे उत्तर दर्शवा. म्हणजे पर्याय म्हणून दिले त्यापेक्षा दुसरा हे उत्तर असेल.

**प्र.3..** $0.7 \times 0.5 = ?$
(1) 35 (2) 0.35 (3) 0.0035 (4) 0.035 (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**प्र.4..** $\frac{24}{65} \times \frac{13}{56} \times \frac{5}{7} = ?$
(1) $\frac{3}{49}$ (2) $\frac{15}{245}$ (3) $\frac{3}{77}$ (4) $\frac{15}{56}$ (5) दिलेल्या पर्यायां व्यतिरीक्त

**(अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :**

(1) परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) इंग्रजी भाषेव्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या इंग्रजी आणि मराठीत असतील.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पांच, उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला सर्वाधिक उचित उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर 'माउस-क्लिक' कारावयाचे आहे. 'क्लिक' केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने 'Save & Next' वर किंवा 'Mark for Review & Next' वर क्लिक करुन उत्तर दिले असेल .**

(4) सर्वर मध्ये घडयाळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणकाच्या पटलाच्या वरच्या उजव्या कोपर्यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घडयाळाची वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतः होऊन परीक्षा संपवण्याची किवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला क्वेश्चन पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले **नाही**, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.



तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.

पडताळणीसाठी खूण केल्याची' स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. "जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल."

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. ध्यानात घ्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी 'Save and Next' वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी व पडताळणी साठी खूण करण्यासाठी 'Mark for Review and Next' वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुसर्या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर वगळण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. "जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये धरले जाईल."

(12) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) सुरक्षित केलेले प्रश्न किवा उत्तर दर्शवल्यानंतर पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) ह्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग पटलाच्या (screen) वरच्या पट्टिकेवर (bar) दर्शवले आहेत. एखाद्या विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला आहे.

(15) एखाद्या विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप पुढच्या विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(16) एखाद्या विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(17) तुमच्या सोईनुसार तुम्ही परीक्षेच्या कालावधीत केव्हाही विभाग आणि त्यांतील प्रश्नांकडे जाऊ-येऊ शकता.

(18) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर का एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार गणला जाईल आणि असा परीक्षार्थी बँकेने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(19) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे समाधान केले जाणार नाही.

(20) 90 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (save) करेल.

(21) **कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेचा वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सबमिट' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थीने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करावयाची नाही, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल**

**(ब) सर्वसामान्य सूचना**

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची नीट दखल घ्या.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या स्थानाची निश्चिती करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षास्थानी जावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे वेळेवर (प्रवेश पत्रावर छापलेल्या) पोहोचू शकाल. उशीरा येणार्यांना प्रवेश नाही.

(3) तुमचा अद्यतन फोटोग्राफ चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा स्थानी आणावयाचे आहे. (शक्यतो तोच फोटो जो तुम्ही अपलोड केला)

(4) परीक्षास्थानी तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि बँकेचे प्रतिनिधि यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. जर का तुम्ही सूचनांचे उल्लंघन कराल तर तुम्हाला अयोग्य गणले जाईल आणि परीक्षास्थान सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय) किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र (उपकरण) यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही.

(6) कृपया आपल्या सोबत अद्यतन फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सध्या कायदेशीरपणे स्विकारण्यायोग्य अस्सल स्वरुपातील फोटो परिचय पत्र (जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/फोटोसहित मतदाता पत्र/गॅझेटेड अधिकार्याच्या किंवा लोकप्रतिनिधिच्या सहीचे अस्सल लेटरहेडवरील फोटो परिचय पत्र/मान्यता प्राप्त महाविद्यालयाने/विश्वविद्यालयाने दिलेले परिचय पत्र (चालू वर्षासाठी स्विकारण्यायोग्य)/फोटोसहित आधारकार्ड/कर्मचारी परिचय पत्र) आणावे. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो-परिचय पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर का आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात कोणताही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो-परिचय पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर का आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात कोणताही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/शपथपत्र उपस्थित केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(7) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे इतर परीक्षार्थींच्या उत्तरांबरोबर उत्तरांच्या सारखेपणासाठी विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष काढता आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर का कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थीस न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. बँक अशा परीक्षार्थी विरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(8) तुम्ही स्वतः सोबत एक बॉलपॉईंट पेन आणावे. एक कागद तुम्हाला दिला जाईल ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर दर्शविण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. परीक्षा संपल्यानंतर परीक्षास्थान सोडण्यापूर्वी तुम्ही हा कागद परीक्षा प्रशासकाला परत करावयाचा आहे.

(9) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी पोहोचण्यावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुसर्या जागेत हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित

आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणार्या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(10) जर का परीक्षा एकाहून अधिक सत्रात घेतली गेली, तर वेगवेगळ्या सत्रात वापरलेल्या प्रश्नमालिकांच्या काठिण्यपातळीतील किंचित फरकांशी जुळवून घेण्यासाठी विविध सत्रातील प्राप्तांकांना इक्वेट केले जाईल. जर का नोड क्षमता कमी असेल किंवा एखाद्या केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवाराच्या बाबतीत काही तांत्रिक बिघाड घडला तर एकाहून अधिक सत्रांची आवश्यकता निर्माण होते.

(11) कृपया नोंद घ्या, एक परिक्षार्थी केवळ एकदाच परिक्षा देऊ शकतो. एका पेक्षा अधिक वेळा परिक्षा दिल्यास परिक्षार्थी पद रद्द करण्यात येईल. जर परिक्षार्थीस एका पेक्षा अधिक प्रवेशपत्र प्राप्त झाले असतील तर प्रवेश पत्रावर दिलेल्या दिनांक आणि वेळेनुसार केवळ एकदाच परीक्षा देऊ शकतो आणि बाकीचे प्रवेश पत्र परत करावे.

(12) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रासमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षाकेंद्रा मधे दिला जाणारा कागद घेऊन जाणारे, किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(13) भरती करण्याच्या कोणत्याही प्रक्रियेतील कोणत्याही भागामधे, परिक्षार्थीद्वारा दिलेली खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमधे अयोग्य घोषित केले जाईल आणि भविष्यामधे बँक कोणत्याही भरती प्रक्रिये मधे भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमधे निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास तर त्याला पहिल्या प्रक्रिये पासूनच अयोग्य ठरविण्यात येईल.

**स्मरणात ठेवण्यासाठी महत्वाचे मुद्दे :**

तुम्हाला स्वतःसोबत खालील गोष्टी आणावयाची सूचना करण्यार येत आहे.

(1) वर मुद्दा क्रमांक 6 मध्ये म्हंटल्याप्रमाणे फोटो चिकटवलेले आवेदन पत्र/अस्सल फोटो परिचय पत्र आणि त्याची फोटोप्रत ।

(2) एक बॉल पॉईंट पेन

**परिक्षेसाठी शुभेच्छा**